# गरुड झेप

www.janatabankpune.com

सन २०१६ – अंक २ रा (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खासगी वितरणासाठी)


## अध्यक्षांचे लेखणीतून



नवीन आर्थिक वर्ष सुरू झाले. नवीन वर्ष येताना ते नवीन आव्हाने घेऊन येते. नव्या आशा घेऊन येते. आव्हानांच्या बरोबर आशा आहे. काही तरी चांगले घडेल, परिस्थितीत सुधारणा होईल, हा आशावाद माणसाला पुढे जायला मदत करतो. आशावादाबरोबर प्रयत्नांची जोड असायला हवी. प्रयत्नांसाठी नियोजन असायला हवे. नियोजन करण्यापूर्वी परिस्थितीचे विश्लेषण करायला हवे. विश्लेषण करण्यासाठी परिस्थितीच्या विविध अंगांचे आकलन व्हायला हवे. परिस्थितीचे सम्यक आकलन होण्यासाठी खूप सारी माहिती गोळा करायला हवी. माहिती गोळा करण्यासाठी झोकून देऊन काम करायला हवे. आपल्याकडे संपूर्ण संगणकीकरण झालेले आहे. एक हजारपेक्षा जास्त सेवकांची साथ आपल्याकडे आहे. या पार्श्वभूमीवर नियोजनासाठी आवश्यक असलेली माहिती गोळा करणे अवघड अजिबातच नाही. पुढची पायरी माहितीच्या विश्लेषणाची. महत्त्वाचे असते ते या वर्षी कशाला प्राधान्य द्यायचे, ज्या बाबींना प्राधान्य द्यायचे त्याची उद्दिष्टे काय ठेवायची या निर्णयांना! हे निर्णय मुख्य कचेरी पातळीवर घेतले जातात. मुख्य कचेरीत ठरवलेली ध्येयधोरणे व शाखांनी करावयाची कार्यवाही ही समांतर व सारख्या दिशेनेच असावयास हवीत. येथे इंग्रजीमधील एक वाक्प्रचार आठवतो. 'लेट अस बी ऑन सेम पेज' अशी सुसंगतता असण्यासाठी परिपत्रकांद्वारे तसेच मॅनेजर्स कॉन्फरन्सद्वारे माहिती दिली जाते. यातून साकारते ते नियोजन. शेवटची पायरी प्रयत्नांची. शाखांनी उद्दिष्टे गाठण्यासाठी काय प्रयत्न केले, कितपत यश मिळाले, शाखेला कोणत्या आधाराची गरज आहे, शाखा कोठे कमी पडते आहे, या सर्व बाबींचा ऊहापोह मीटिंगमध्ये केला जातो. या सर्व प्रक्रियेची जाणीव व त्यात मन:पूर्वक सहभाग ही केवळ शाखाधिकाऱ्यांची जबाबदारी नाही. प्रत्येक कर्मचारी यातील कोणत्या ना कोणत्या प्रक्रियेचा घटक आहे. त्याबाबत त्याने मन:पूर्वक काम केले तर यशाचा सेतू बांधणे अजिबात अवघड नाही. आपला वाटा खारीचा असला तरी तो प्रत्येकाने उचलायला पाहिजे.

देशस्तरावरील बँकिंग उद्योगासमोर अनेक प्रश्न आहेत. तेच प्रश्न आपल्यालाही कमी अधिक प्रमाणात भेडसावतात. उदा. घटती नफाक्षमता, वाढती थकीत कर्जे, व्याजदराबाबत बँकाबँकांमधील स्पर्धा, ग्राहकांच्या सततच्या वाढत्या अपेक्षा इत्यादी. याबाबत आपण उपाय योजना ठरवून शाखांना उद्दिष्टे देतो. शाखा व मुख्य कचेरीतील प्रत्येकाने त्या उद्दिष्टपूर्तीसाठी आपला सहभाग दिल्यास स्वीकारलेली उद्दिष्टेच छोटी वाटू लागतील यात शंका नाही.

तुमच्या सर्वांच्या प्रयत्नांना हार्दिक शुभेच्छा!

# बँकेच्या 'ई–न्यूजलेटर'चे श्री. माधव भंडारी यांच्या हस्ते अनावरण



**पुणे :** सध्याच्या युगात प्रत्येक क्षेत्र अधिक प्रगत आणि एक पाऊल पुढेच राहण्याचा प्रयत्न करीत आहे. हेच उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून बँकेच्या वतीने ग्राहकांना अधिक सुलभ सेवा देण्याकरिता 'ई–न्यूजलेटर' सुरू करण्यात आले आहे.

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर शुक्रवारी (८ एप्रिल २०१६) बँकेच्या 'ई–न्यूजलेटर'चे भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ते श्री. माधव भंडारी यांच्या हस्ते अध्यक्ष अरविंद खळदकर व मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत केतकर यांना ईमेल पाठवून या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे. बँकेच्या बाजीराव रोड शाखेत हा कार्यक्रम झाला.

बँकेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही गुढीपाडवा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर, उपाध्यक्ष संजय लेले, संचालक मंडळ सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत केतकर, वरिष्ठ अधिकारी आणि इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते. श्री. खळदकर यांच्या हस्ते श्री. भंडारी यांचा सत्कार केला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना श्री. भंडारी म्हणाले, ''स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुभाषचंद्र बोस आणि संघ यांचा एकत्रित अभ्यास युवकांनी करायला हवा. यासाठी प्रथम त्यांनी आपला इतिहास समजून घ्यावा. सध्याच्या काळात अशा प्रकारच्या अभ्यासाची गरज आहे.''

बँकेच्या वाटचालीबद्दल मत व्यक्त करताना श्री. भंडारी म्हणाले, ''बँकेनी अनेक चढउतार अनुभवले आहेत. आज बँकेची वाटचाल अभिमानास्पद रीतीने सुरू आहे. या दोन्ही स्थितीत बँक संघाने घालून दिलेल्या तत्त्वाच्या आधारे सेवा देते आहे. ही कौतुकास्पद बाब आहे.''

जनता बँकेच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरांतील ग्राहकांना चांगली सेवा देण्याचे काम करत राहणे हा देखील एक प्रकारचा संघ विचारच आहे. 'ई–न्यूजलेटर'च्या माध्यमातून सध्याच्या हायटेक युगात आम्ही एक पाऊल पुढे राहण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि त्याचा आम्हाला अभिमान असल्याचे श्री. खळदकर यांनी नमूद केले.

हे ई–न्यूजलेटर दर आठवड्याला प्रसिद्ध करण्यात येणार आहे. ते बँकेच्या सर्व ग्राहकांना 'ई–मेल'द्वारे मिळणार आहे. बँकेसंदर्भातील घडामोडी, ग्राहकांसाठीचे महत्त्वाचे निर्णय, बँकेची भूमिका आदींची माहिती या 'ई–न्यूजलेटर'च्या माध्यमातून देण्यात येणार आहे.

शाखा व्यवस्थापक यशवंत ढवळीकर यांनी प्रास्ताविक केले; तर सहाय्यक शाखा व्यवस्थापक राजेंद्र पत्की यांनी आभार मानले.

# संवादातून 'गरुडझेप' समृद्धीची



'सहकार्यम् यशोधनम्' हे आपल्या बँकेचे ब्रीद. आणि हे ब्रीद उराशी बाळगून अनेक चढ-उतारांचे साक्षीदार बनत आजवरचा प्रवास सुरू आहे. हे ब्रीद प्रत्यक्षात आणताना आपण ग्राहक, खातेदार व सभासदांनी आमच्यावर जो सार्थ विश्वास टाकला आहे, त्यातून प्रगतीची अनेक दारे खुली झाली... आणि पाहता-पाहता बँकेने मोठा टप्पा पार केला.

एका दिवसात शंभर कोटी रुपयांच्या ठेवींचं ध्येय गाठण्यात यश आलं, ही याची सार्थ व सर्वोत्तम पावती आहे, असं अभिमानाने सांगावसं वाटतं. हा यशस्वी प्रवास शक्य झाला आहे, तो आपणा सर्वांचा आमच्यावरील विश्वास, चांगली सेवा, सांघिक कौशल्य आणि संवादामुळेच.

संवादाचे महत्त्व आम्ही जाणतोच आहोत. मात्र काळ बदलतो आहे, सेवा बदलत आहेत... ग्राहकांच्या अपेक्षाही बदलत आहेत. या काळाच्या कसोटीवर खरे उतरण्यासाठी गरज आहे ती, हा संवाद आणखी बळकट करण्याची व दुतर्फा होण्याची...

काळानुरूप संवादाची माध्यमेदेखील बदलत आहेत. त्या बदलांच्या प्रवाहात आम्हीदेखील आहोतच... मात्र अस्तित्वात असलेल्या संवाद प्रवाहाचे पात्र विस्तीर्ण व्हावे, त्या बदलांतून ग्राहकहित जोपासले जावे, आणि त्यातून आपल्या मनातील बँकेची प्रतिमा देखील अधिक स्वच्छ, स्पष्ट बनावी हाच या नव्या प्रयत्नांमागचा हेतू...

या नव्या प्रयत्नांत आपण डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून एकाच वेळी ईमेल, फेसबुक, ट्विटर, या व सोशल मीडियाद्वारे संपर्कात राहण्याचा प्रयत्न करणार आहोत. मात्र हा संपर्क आपणासाठी अधिक फलदायी, आपल्या ज्ञान, माहितीत अधिक भर टाकणारा कसा होईल, याचीच अधिक काळजी घेतली जाणार आहे...

या प्रयत्नांमध्ये नेहमीप्रमाणे ग्राहकहिताला प्राधान्य असलेली माहिती, वृत्त, आर्थिक क्षेत्रातील बदलांविषयीचं मार्गदर्शन, त्याविषयी बँकेने स्वीकारलेली ग्राहकहिताची भूमिका, गुंतवणूक सल्ला, नव्या सेवा, नव्या योजना, बँकेला कुटुंब मानणाऱ्या कर्मचारी विश्वातील वार्ता, समाजहितासाठी विविध उपक्रमांद्वारे बँकेने स्वीकारलेले सेवेचे व्रत व त्याविषयीचे वृत्त या अशा अनेक गोष्टी या संवादाच्या निमित्ताने आपल्यापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न असणार आहे.

विशेष म्हणजे हा प्रयत्न आधुनिक रूपात, ग्राहकांना विशेषतः आमच्या तरुण ग्राहकांना अधिक भावणारा असेल आणि त्यांना त्यांच्या आर्थिक क्षेत्रातील पायवाट ठरविण्यासाठी मदतीची ठरणारी असेल.

या हेतूने हे सारे आधुनिक संवादाचे प्रयत्न आहेत, पण हा संवाद दुतर्फा होणे अपेक्षित आहे. आम्हाला सतत प्रोत्साहन देणारा आपला प्रतिसाद इथे देखील यावा ही अपेक्षा... तर मग चला तुम्हाला या संवादात काय अपेक्षित आहे. ते आम्हाला नक्की कळवा बरं...!

**– संजय लेले**
**उपाध्यक्ष**

# 'सोशल मीडिया'वर उभारू सहकाराची गुढी



'सहकार्यम् यशोधनम्'चा जयघोष करीत 'सहकाराची गुढी' खांद्यावर घेऊन मागील सहा दशकांहून अधिक काळ बँक यशस्वीरीत्या वाटचाल करीत आहे. ग्राहकांचा विश्वास, आपुलकी आणि जिव्हाळा संपादन केलेली ही बँक 'छोट्या लोकांची मोठी बँक' म्हणून ओळखली जाते.

महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यांतील ५६ शाखांच्या माध्यमातून बँक सर्व आर्थिक स्तरातील ग्राहकांना बँकिंग विश्वातील अत्याधुनिक सेवा-सुविधा अल्पदरात उपलब्ध करून देत आहे. यामध्ये इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, एनिव्हेअर बँकिंग, टॅब बँकिंग, डोअर स्टेप बँकिंग, NEFT, RTGS, विमा, डीमॅट अशा अनेक आधुनिक व तंत्रज्ञानावर आधारित सेवा-सुविधांचा समावेश आहे.

सहकारी बँकिंग क्षेत्रात कार्यरत असून देखील खासगी आणि राष्ट्रीयीकृत बँका देत असणाऱ्या जवळपास सर्वच सेवा-सुविधा ग्राहकांना तत्परतेने उपलब्ध करून देण्यासाठी जनता सहकारी बँक नेहमीच प्रयत्नशील असते.

आपणास सांगण्यास नक्कीच आनंद होतो आहे की, २०१५-१६ हे आर्थिक वर्ष नुकतेच सरले. या आर्थिक वर्षात बँकेने सर्वच आघाड्यांवर अतिशय उत्तम कामगिरी केली आहे. बँकेच्या ठेवी- रुपये ७ हजार ६७८.३२ कोटींवर गेल्या आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत यामध्ये रुपये ६०८.३६ कोटींची वाढ झाली आहे. कर्जवितरण रुपये ५ हजार १२६.७१ कोटींवर पोहोचले असून त्यामध्ये रुपये ३७५.४४ कोटींची वाढ झाली आहे. बँकेची एकूण उलाढाल रुपये १२ हजार ८०५.०३ कोटी झाली आहे. विशेष म्हणजे या एकूण व्यवसायात रुपये ९८३.८० कोटींची घसघशीत वाढ नोंदवण्यात आली आहे. बँकेची ही आर्थिक प्रगती नक्कीच सुखावणारी आहे. आगामी काळात प्रगतीची शिखरे सर करण्यासाठी आपल्या सारख्या सजग ग्राहकांची साथ आम्हाला हवी आहे. आपली साथ आम्हाला नक्कीच मिळेल.

सन २०१५-१६ हे आर्थिक वर्ष देशातील बँकिंग विश्वासाठी एका अर्थाने खूपच निराशाजनक गेले. 'एनपीए' (नॉन परफॉर्मिंग ॲसेट) या तीन अक्षरांनी बँकिंग विश्वाला घट्ट विळखा घातला त्यातून कोणतीही बँक सुटू शकली नाही. या 'एनपीए'च्या चक्रातून बाहेर पडण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकने अनेक उपाययोजना आखल्या व त्याची कडक अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. यामुळे आगामी काळात बँकिंग विश्व 'एनपीए'च्या कचाट्यातून काही प्रमाणात तरी बाहेर येण्याची शक्यता दिसू लागली आहे.

अशा या अतिशय प्रतिकूल परिस्थितीत देखील बँकेने सर्वच आघाड्यांवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. याचे श्रेय मुख्यतः ग्राहकांनी बँकेवर दाखविलेला विश्वास, बँकेचे संचालक मंडळ, वरिष्ठ अधिकारी वर्ग आणि सर्व कर्मचाऱ्यांना द्यावे लागेल. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच बँकेने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात सुमारे ९ टक्के इतकी वाढ नोंदविण्यात यश मिळविले. ही गोष्ट नक्कीच उत्साहवर्धक आहे.

पुन्हा एकदा शुभेच्छांसह...

**– जयंत केतकर**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

# पुर्ण अर्बन बँकेच्या वतीने श्री. अरविंद खळदकर यांना 'सहकार महर्षी' पुरस्कार



पुणे अर्बन बँकेच्या वतीने कै. शिवाजीभाई ढमढेरे स्मृती पुरस्कार समारंभात बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकरसाहेबांचा पुण्याचे महापौर श्री. प्रशांत जगताप यांच्या हस्ते सहकार महर्षी पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. श्री. खळदकरसाहेबांचे हार्दिक अभिनंदन!!

## श्री. भंवरलालजी जैन यांना राष्ट्रीय समाज रत्न पुरस्कार



**पुणे** : येथील मेवाड जैन संघाचे प्रमुख तसेच सामाजिक व धार्मिक कार्यकर्ते श्री. भंवरलालजी कच्छारा जैन (मेवाडवाला) याना अखिल भारतीय मारवाडी-गुजराती मंच; नाशिकच्या वतीने समाजात सामाजिक व धार्मिक कार्यामध्ये उल्लेखनीय कार्य करीत असल्यामुळे त्यांना दि. १६ जानेवारी २०१६ रोजी माजी मंत्री व विधानसभेचे माजी सभापती श्री. अरुणभाईजी गुजराती यांच्या शुभहस्ते 'राष्ट्रीय समाज रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. या प्रसंगी माजी केंद्रीय मंत्री, खासदार श्री. दिलीपजी गांधी, सहकारमंत्री श्री. जयप्रकाशजी मुंदडा, माजी पुरवठामंत्री श्री. रमेशजी बंग, भारतीय जैन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. प्रफुल्लजी पारख आदी उपस्थित होते.

## सुमेधा रजपूत 'उमंग ॲवॉर्ड' ने सन्मानित



शिवाजीनगर पुणे शाखेतील सेवक श्री. विजय रजपूत यांची कन्या कु. सुमेधा विजय रजपूत हिला नाळकर इन्स्टिट्यूटमध्ये वर्ष २०१५-२०१६ या वर्षाचा डिप्लोमा इन आर्किटेक्चर ड्राफ्ट्समन या कोर्ससाठी 'बेस्ट प्रोग्रेसिव्ह स्टुडंट' म्हणून कै. शोभना गजानन नामपूरकर यांच्या नावे पुरस्कार मिळाला.

या पुरस्काराचे नाव 'उमंग अवॉर्ड' असे आहे.

## बाजीराव रोड शाखेच्या खातेदार सुनीता कापरे यांचा सत्कार



आपल्या बाजीराव रोड शाखेतील खातेदार सौ. सुनीता गोपाळ कापरे यांचा गेल्या ३२ वर्षांपासून वृत्तपत्र विक्रीचा व्यवसाय आहे. महिला दिनानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला.

## सागर नथवाणी सी.ए. परीक्षेत उत्तीर्ण



शिवाजीनगर पुणे शाखेतील खातेदार श्री. दीपक दामजीभाई नथवाणी (खाते क्र. १९०२७) यांचे चिरंजीव श्री. सागर दीपक नथवाणी हे नोव्हेंबर २०१५ मध्ये झालेल्या CA Course परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. त्याबद्दल शाखेमध्ये सत्कार करण्यात आला. सागर यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण वाडिया कॉलेजमधून पूर्ण केलेले आहे.

## उझबेकिस्तानमधील भारतीय सांस्कृतिक केंद्रामध्ये आस्था कार्लेकरांची नियुक्ती



शनिवार-नारायण पेठ शाखेतील बचत खातेदार सौ. आस्था मंदार कार्लेकर यांची उझबेकिस्तानमधील ताशकेन्त स्थित लाल बहादूर शास्त्री भारतीय सांस्कृतिक केंद्र, भारतीय दूतावास येथे कथ्थक नृत्यशिक्षिका व सादरकर्त्या (परफॉर्मर) म्हणून नियुक्ती झाली आहे.

**अभिनंदन!**

**बँकिंग परिक्षांमधील यशाचे मानकरी**

**श्री. संजय भास्कर आगाशे**

**कनिष्ठ अधिकारी, स्थावर विभाग**

**IIBF ची AML & KYC परीक्षा उत्तीर्ण**

# शनिवार-नारायण व टिळक रोड शाखा सुवर्णमहोत्सवी वर्ष समारोप कार्यक्रम संपन्न



बँकेच्या शनिवार-नारायण व टिळक रोड शाखा यांची सुरुवात २७/०२/१९६६ रोजी झाली होती. दोन्ही शाखांचा ५० वा वर्धापनदिन एकत्रितरीत्या आयोजित करण्यात आला होता. त्यांच्या सुवर्णमहोत्सवी वर्ष समारोप कार्यक्रमानिमित्त गाण्याचा कार्यक्रम शाखेचे खातेदार/सभासद यांचेसाठी आयोजित करण्यात आला होता.

या दिवशी भैरव ते भैरवी हा निश एन्टरटेन्मेंट यांचा कार्यक्रम होता. प्रमुख गायक श्री. विजय कोपरकर, श्री. दत्तप्रसाद रानडे व सायली पानसे होते. कार्यक्रमात विविध रागांची माहिती व गायन आयोजित केलेले होते. कार्यक्रमास बँकेचे मा. अध्यक्ष. श्री. अरविंदराव खळदकर व उपकार्याध्यक्ष श्री. संजयराव लेले तसेच संचालक श्री. सुधीर पंडित उपस्थित होते. खातेदारांचा चांगला प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. पुजारी यांनी केले. कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी शनिवार- नारायण पेठ शाखेत श्री सत्यनारायण महापूजा संपन्न झाली. पूजेस जनहित पतसंस्थेचे मा. श्री. विनोद खोले, निनाद पतसंस्थेचे मा. श्री. उदय जोशी, केशव माधव नागरी सहकारी पतसंस्थेचे मा. श्री. राज चौधरी, पुणे महानगर संघ संचालक मा. श्री. बापू घाटपांडे, जनकल्याण समितीचे मा. श्री. शरदभाऊ खाडिलकर, मा. श्री. विनायकराव डंबीर, गोविज्ञान संस्थेचे बापूराव कुलकर्णी, उद्योगपती मा. श्री. शरद बाळ, व्यावसायिक मा. श्री. राजेश शहा, स्थानिक सल्लागार समिती सदस्य मा. श्री. राजाभाऊ वाईकर असे अनेक मान्यवर उपस्थित होते.

# गांधीनगर, कोल्हापूर शाखेच्या खातेदारांशी मा. खळदकर यांचा मुक्त संवाद

नवीन गांधीनगर शाखेत मा. कार्याध्यक्ष श्री. खळदकर साहेब यांनी दि १५/०३/२०१६ रोजी प्रथम भेट दिली त्या वेळी काही मोजके गांधीनगर शाखेकडील मान्यवर ठेवीदार, कर्जदार, हितचिंतकांना शाखेत बोलावले होते. त्या वेळी वरील बोलावलेल्या खातेदारांशी खालील विषयावर चर्चात्मक गप्पागोष्टी झाल्या.



१) बँकेची माहिती सर्वांना संक्षिप्त सांगितली.
२) प्रत्येकाने आपली व आपल्या व्यवसायाची ओळख करून दिली.
३) बहुतेक खातेदारांनी व्याजदर कमी करणेबाबत विषय मांडला.
४) रु. १० लाखांपर्यंत कॅश क्रेडिट जोड तारण न घेता कमी व्याज दराने उपलब्ध करून द्यावी अशी सूचना आली.
५) गांधीनगर व या व्यापारी पेठेसाठी विशेषत्वाने कॅश दुकानातून नेणे/व्याजदर सवलती देणेबाबत काही खातेदारांनी विषय चर्चेत आणला.
६) आपल्या बँकेची सेवा चांगली असून त्यासाठी खातेदार ०.५० टक्के व्याजदर बाहेरील बँकांपेक्षा देणेची तयारी दर्शविली.

मा. श्री. खळदकर साहेब यांनी सर्व मुद्द्यांना समर्पकपणे उत्तरे देऊन उपस्थितांचे समाधान केले. कोल्हापूर शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. दुनाखे साहेब यांनी बँकेच्या अन्य सेवांबद्दल (नेट बँकिंग/ एसएमएस/ पॉझ मशीन सेवा इ.) माहिती दिली. शेवटी शाखा व्यवस्थापक श्री. श्रीराम दातार यांनी सर्वांचे आभार मानून चहापान झाल्यानंतर कार्यक्रम संपन्न झाला.

सर्व नवीन खातेदार असल्याने बँकेचे चेअरमन डायरेक्ट खातेदारांशी गप्पांचे स्वरूपात खातेदारांशी संवाद साधतात, असा अनुभव प्रथमच आला, असे खातेदारांनी सभेनंतर मते व्यक्त केली आहेत.



# बँकेच्या ५६ व्या सोलापूर शाखेचा शुभारंभ



सोलापूर दिनांक २१ मार्च २०१६ - सहकारी बँकिंग क्षेत्रात वेगाने प्रगती करणाऱ्या पुण्यातील जनता सहकारी या मल्टिस्टेट शेड्युल्ड बँकेच्या सोलापूर शाखेचा आणि एटीएम केंद्राचा शुभारंभ सोमवार, दिनांक २१ मार्च २०१६ रोजी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष मा. आ. सुधाकरपंत परिचारक यांच्या हस्ते एका दिमाखदार सोहळ्याद्वारे करण्यात आला. या प्रसंगी जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर, उपाध्यक्ष मा. श्री. संजय लेले, संचालक मंडळ सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. जयंत केतकर, सभासद, खातेदार, ग्राहक आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. बँकेची ही ५६ वी शाखा असून सोलापूर शहर व जिल्ह्यातील ही पहिलीच शाखा आहे.

उद्घाटनानंतर बोलताना मा. श्री. परिचारक यांनी जनता सहकारी बँकेच्या सोलापूर शाखेला शुभेच्छा दिल्या तसेच बँकेच्या सेवा-सुविधांचा सोलापूरमधील जनतेने लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर म्हणाले, सोलापूर शाखेच्या माध्यमातून येथील जनतेला अत्याधुनिक बँकिंग सेवा-सुविधा देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. ग्राहकांनी सोलापूर शाखेत आपले खाते उघडून बँकेच्या सेवा-सुविधांचा अनुभव घ्यावा. जनता सहकारी बँकेची सोलापूर शाखा शहराच्या मध्यवर्ती मोरारजी पेठ, प्रभात चित्रमंदिर जवळ, टाइम स्क्वेअर बिल्डिंग येथे सुरू करण्यात आली असून या शाखेच्या माध्यमातून ग्राहकांना एनिव्हेअर बँकिंग, मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, एटीएम, आरटीजीएस, नेफ्ट, विमा, डिमॅट या आधुनिक सेवा-सुविधा उपलब्ध होणार आहेत.

# बँकेची अहमदनगर व गोरेगाव-मुंबई शाखा कार्यान्वित



**अहमदनगरमधील पहिल्या शाखेचा शुभारंभ रा. स्व. संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे प्रांत संघचालक मा. सुरेश अण्णाजी तथा नानासाहेब जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी डॉ. प्र. ल. गावडे, शाखा व्यवस्थापक मकरंद जोशी, संचालक जगदीश कदम आदी मान्यवर उपस्थित होते.**



**गोरेगाव (पश्चिम) मुंबई शाखेचा शुभारंभ प्रसिद्ध उद्योजक आणि विश्व हिंदू परिषद कोकण प्रांत अध्यक्ष देवकीनंदन जिंदल यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी 'एनपीसीआय' चे उपाध्यक्ष-वित्तीय समावेशकता मा. श्री. नवनीतकुमार, बँकेचे उपाध्यक्ष संजय लेले, संचालक अतुल बेडेकर, शाखा व्यवस्थापक अंकुश बेटकर आदी मान्यवर उपस्थित होते.**

पुणे : आपल्या बँकेच्या अहमदनगर आणि गोरेगाव (पश्चिम) मुंबई या दोन शाखांचे आणि एटीएम केंद्रांचे उद्घाटन नुकतेच दि. २५ मे २०१६ रोजी दिमाखदार सोहळ्यात करण्यात आले. या प्रसंगी मान्यवर, ग्राहक, हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहमदनगर शाखेचे उद्घाटन रा. स्व. संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे प्रांत संघचालक मा. श्री. सुरेश अण्णाजी तथा नानासाहेब जाधव यांच्या हस्ते करण्यात आले तर एटीएम केंद्राचे उद्घाटन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व बँकेचे माजी संचालक मा. श्री. डॉ. प्र. ल. गावडे यांच्या हस्ते झाले.

मुंबईतील गोरेगाव (पश्चिम) शाखेचा शुभारंभ प्रसिद्ध उद्योजक आणि विश्व हिंदू परिषद कोकण प्रांत अध्यक्ष मा. श्री. देवकीनंदन जिंदल यांच्या हस्ते तर येथील एटीएम केंद्राचा शुभारंभ, 'एनपीसीआय' चे उपाध्यक्ष-वित्तीय समावेशकता मा. श्री. नवनीतकुमार यांच्या हस्ते करण्यात आला. उद्घाटन प्रसंगी मान्यवरांचा बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

दोन्ही शाखांच्या उद्घाटन प्रसंगी मान्यवर, ग्राहक, सभासद, हितचिंतक, बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. संजय लेले, संचालक मा. श्री. जगदीश कदम, मा. श्री. बिरू खोमणे, मा. श्री. किशोर शहा, मा. श्री. रामदास शिंदे, मा. श्री. विजय भावे, मा. श्री. आमदार चंद्रशेखर कदम, रा. स्व. संघाचे पदाधिकारी मा. श्री. शांतीभाई चंदे, मा. श्री. भरतराव निमसे, मा. श्री. डॉ. रवींद्र साताळकर, मा. श्री. ॲड. अशोकराव झरकर, मा. श्री. संग्रामभय्या जगताप, मा. श्री. अरुणकाका जगताप, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# ताणतणावांवर पुष्पौषधे



ताणतणाव या संज्ञेची व्याख्या वेगवेगळ्या पद्धतींनी केली जाते. एक सोपी व्याख्या आहे. तणाव म्हणजे परिस्थितीचा अस्वीकार. त्याचे कमीत कमी दुष्परिणाम स्वतः वर होऊ देणाऱ्याला परिस्थितीचा स्वीकार करणे जमते, दुर्लक्ष करायला जमते. तणावाचा सामना करताना तो स्वीकारणे, तो उद्‌भवण्याची कारणे जाणून घेणे आणि निराकरण करून तणावमुक्त होणे या सर्व पायऱ्या वॉलनट हे पुष्पौषध घेण्याने सोप्या होतात. परिस्थितीतला बदल न रुचल्याने, न झेपल्याने बदलाबद्दल तक्रार हे लक्षण सर्वांमध्ये दिसते आणि त्यामुळे वॉलनटची गरज असणारे लोक पोती भरभरून आढळतात.

कामाचे ठिकाण घरापासून दूर गेले, राहते घर बदलावे लागले, बदलीमुळे परगावी जावे लागले, कनिष्ठ, वरिष्ठ, सहकारी बदलले, कामाचे स्वरूप किंवा वेळापत्रक बदलले की माणूस अस्वस्थ होऊन किरकिरू लागतो. त्याला आधीचे आयुष्य सोपे, सुखकारक वाटते, कारण ते परिचयाचे असते. बदल अंगवळणी पडणे अवघड वाटते. तेव्हा वॉलनट देतात. कामाच्या ठिकाणी आता विविध प्रशिक्षणे सक्तीची असतात. पदोन्नतीसाठी संगणकाचे अभ्यासक्रम, व्यवस्थापन, कायदेविषयक शिक्षण घेणे भाग पडते. काहीही शिकणे हा मोठा बदल असतो. कामानिमित्त परकीय भाषा, नवे तंत्रज्ञान आत्मसात करावे लागणे म्हणजे बदल असतो. बदलाबरोबर जुळवून घेण्यासाठी वॉलनट मदत करते. काम करताना सतत नवी आव्हाने स्वीकारावी लागतात. जुन्या पद्धती मोडीत निघाल्याने नव्या पद्धतींचा अंगीकार करावाच लागतो. सांधेबदल करताना खडखडाट न होता गाडी सुरळीत जाण्यासाठी मदत करणारे वंगण म्हणजे वॉलनट.

कौटुंबिक आयुष्यातही सतत बदल होतात. विवाह, अपत्यसंगोपन (छोट्या बाळामुळे सर्व कुटुंबीयांचे वेळापत्रक कोलमडते) आजारपण, घटस्फोट, मृत्यूसारख्या घटनांमुळे नातेसंबंध, संदर्भ, आवश्यकता, अनावश्यकता, आर्थिक/ सामाजिक स्थितीमध्ये बदल घडतात. जुन्याचा आग्रह सोडून देऊन नव्या परिस्थितीबरोबर जमवून घेणे वॉलनटमुळे साध्य होते. आणि तणाव लुप्त होतो. तणावाची गुलामी पत्करण्याऐवजी तणावाचा वापर नोकराप्रमाणे करून घेण्यामध्ये चतुराई असते. बदललेल्या परिस्थितीकडे चुकीच्या दृष्टिकोनाऐवजी अनुकूल दृष्टिकोनातून बघण्याचे दुनिया रंगीबेरंगी आणि हवीहवीशी वाटू लागते.

**रेस्क्यू रेमेडी – तणावकारक परिस्थिती**

ताणावकारक परिस्थिती उद्‌भवली असता झटपट देण्याचे विस्मयकारक सुपरिणाम खात्रीलायकरीत्या घडवणारे औषध म्हणजे रेस्क्यू रेमेडी. अनुभव, तर्कसंगती आणि सखोल विचारांची सांगड घालून डॉ. बॅचनी बनवलेले पाच पुष्पौषधांचे हे मिश्रण दुकानामध्ये तयारच मिळते. रस्त्यावरील अपघात (बघणे किंवा स्वतःला होणे) मारामारी, बॉम्बस्फोट, गोळीबार, दरोडा, शस्त्राघात, भूकंप, वादळ, रॅगिंग अशा दुर्घटनांमुळे मनुष्य थरथर कापतो. काही जणांना घाम फुटतो. काहीजण किंकाळ्या फोडतात तर काही जणांची दातखीळ बसते. दुर्घटनेमुळे चिडचिड होणे, रडू फुटणे, आत्मविश्वास ढासळणे, स्वभाव काळजीखोर होणे, निराशा वाटणे अशी लक्षणे व्यक्तीनुसार वेगवेगळ्या कालावधीपर्यंत टिकून राहतात. रेस्क्यूमुळे दुष्परिणामांची तीव्रता आणि कालावधी कमी होतो. अपमान, आर्थिक फसवणूक, घटस्फोट, प्रेमभंग, बलात्कार, ठरलेला विवाह मोडणे यापैकी भावनिक फसवणूक, जमीन खरेदी- विक्री व्यवहारात किंवा शेअर बाजारात फटका बसणे, जोडीदार बाहेरख्याली निघणे, परीक्षेत अनपेक्षितरीत्या अनुत्तीर्ण होणे, आप्तस्वकीयांचा मृत्यू यांचे मनावर दुष्परिणाम होणे अटळ असते. रेस्क्यू त्यावरचा हमखास गुणकारी इलाज आहे. भयानक प्रसंगाने मनाला बसलेल्या हबक्यामधून सावरण्यासाठी या मिश्रणामधले स्टार ऑफ बेथलेहेम हे पुष्पौषध मदत करते. मनाची तंग अवस्था, चिडचिड इम्पेशन्स दूर करते. यातील

➤ पान क्र. ७ वर ...

## खातेदारांचे अंतरंग

### ग्राहक सेवेचा मापदंड : 'जनता बँक'

सहकारी बँकांच्या सध्याच्या स्पर्धात्मक युगात फिनिक्स पक्ष्याप्रमाणे गरुडभरारी घेऊन ग्राहकाभिमुख सेवा पुरविण्यात यशस्वी झालेल्या पुण्यातील जनता बँकेच्या संचालक मंडळाचे व अध्यक्ष मा. अरविंद खळदकर यांचे त्रिवार अभिनंदन. मी त्यांच्या 'नवल वर्तले' पुस्तकाचा वाचनानुभव घेतला आहे. अडचणीतून संस्था बाहेर काढणे सोपे नाही, याचा अनुभव मी घेतला आहे, घेत आहे. मीही पुण्यातील एकेकाळच्या अग्रगण्य सह. बँकेचा सेवक आहे. परंतु ढिसाळ कारभार, आर्थिक बेशिस्त व तत्कालीन सरकारच्या दुर्लक्षाचे परिणाम ग्राहक व सेवक यांना भोगावे लागतात. अर्थात 'जनता बँक' याला नक्कीच अपवाद आहे. मी व माझी पत्नी बँकेच्या सहकारनगर शाखेचे गेली चोवीस वर्षे ग्राहक आहोत. ऑक्टोबर १९९२ मध्ये बचत खाते उघडले तेव्हापासून आजपर्यंत येथील अतिशय नम्र सेवकांच्या 'ग्राहकाभिमुख' सेवेचा अनुभव घेत आहोत. माझ्या पत्नीचा छोटासा केटरिंग व्यवसाय असून तिचे चालू खाते व सभासदत्वही आहे. कोणत्याही प्रकारच्या अडचणीत बँकेने अतिशय उत्तम सहकार्य केले आहे. फोनवर संपर्क साधून माहिती देणे, सस्मित चेहऱ्याने स्वागत करणे, समोरचा माणूस चिडल्यास त्याचे समाधान करणे ही सोपी गोष्ट नाही. हे केवळ एक सेवक म्हणून सांगू शकतो. बँकेने सध्याच्या काळात माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय कार्य सुरू करून जी नेत्रदीपक प्रगती केली आहे त्याबद्दल खळदकर साहेबांचे कौतुक करावे तेवढे थोडेच. राष्टीयीकृत बँकेच्या सर्वस्वी वाईट सेवेचा अनुभव मी घेतला आहे. तेथे त्यांना सर्वसामान्य ठेवीदार ग्राहकांशी काही घेणे-देणे नसते. परंतु जनता बँकेत परिस्थिती बरोबर उलट आहे असे म्हणल्यास वावगे होणार नाही. बँकेची उत्तरोत्तर अशीच प्रगती होत राहो, ही सदिच्छा व्यक्त करतो. मा. खळदकर साहेब व त्यांचे सर्व सहकारी तसेच सेवक व अधिकारी वर्गाला दीर्घ आयुरारोग्य लाभो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

**– किरण गुळुंबे, मो. ९६८९९२९७२०**

### छोट्यांची मोठी बँक

शाखा अधिकारी,
जनता सहकारी बँक लि टिळक रोड शाखा,

दि. २८ फेब्रुवारी २०१६ रोजी पन्नास वर्षे पूर्तीबद्दल केलेल्या सांगता समारंभाचे निमंत्रणाबद्दल शतशः आभार! बँकेशी जवळीक असल्याचा अभिमान वाटतो. अशाप्रकारच्या कार्यक्रमाद्वारे बँकेने खातेदार व हितचिंतक यांच्याशी जवळीक साधली आहे. आधुनिकीकरण काळाची गरज असताना आपले एक पाऊल पुढे असणे महत्त्वाचे! त्या अनुरूप सर्व प्रकारच्या सेवांचे वारंवार आधुनिकीकरण केल्यामुळे सर्व सेवेनी सिद्ध आहे. बँकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी बांधव कार्यक्षम राहून हसतमुखाने आपुलकीची वागणूक देतात. आपल्या बँकेने एका दिवसात मोठी रक्कम संकलन केल्याचे ऐकून हा एक 'मानाचा तुराच' म्हणावा लागेल. आमच्यासारख्या 'छोट्यांची मोठी बँक' ही संकल्पना पूर्ण झाली. भविष्यातील वाटचालीस आमच्या शुभेच्छा!

**– अजित गजानन हर्षे, पुणे ३०**

# कोल्हापूर शाखेच्या ‘ऑफ साईट एटीएम’चे उद्घाटन



**बँकेच्या गंगावेस- कोल्हापूर येथील ‘ऑफ साईट एटीएम’चे उद्घाटन दि न्यू एज्युकेशन सोसायटी कोल्हापूरचे अध्यक्ष विनोदकुमार लोहिया यांच्या हस्ते मंगळवार, १५ मार्च २०१६ रोजी करण्यात आले. या प्रसंगी बँकेचे अध्यक्ष अरविंद खळदकर, संचालिका डॉ. सौ. मधुरा कसबेकर आदी मान्यवर उपस्थित होते.**

**कोल्हापूर :** सहकारी बँकिंग क्षेत्रात झपाट्याने प्रगती करणाऱ्या आपल्या बँकेने गंगावेस कोल्हापूर येथे उभारलेल्या ‘ऑफ साईट एटीएम’चा शुभारंभ दि न्यू एज्युकेशन सोसायटी कोल्हापूरचे अध्यक्ष विनोदकुमार लोहिया यांच्या हस्ते करण्यात आला. बँकेचे हे सहावे ‘ऑफ साईट एटीएम’ केंद्र आहे. या प्रसंगी आपल्या बँकेचे अध्यक्ष अरविंद खळदकर, संचालिका डॉ. सौ. मधुरा कसबेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत केतकर, बँकेचे सभासद, ग्राहक आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बँकेचे कोल्हापूर येथील हे पहिलेच ‘ऑफ साईट एटीएम’ असून ते कोल्हापूर शहरातील गंगावेस या प्रसिद्ध ठिकाणी उभारण्यात आले आहे. या परिसरात नागरिकांना आणि या भागातील व्यावसायिकांना या ‘ऑफ साईट एटीएम’चा उपयोग होणार आहे. सध्या आपल्या बँकेच्या कोल्हापुरातील लक्ष्मीपुरी दसरा चौक आणि गांधीनगर येथे दोन शाखा कार्यरत असून या शाखांच्या माध्यमातून कोल्हापूरमधील अत्याधुनिक सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या कार्यक्रमात श्री. खळदकर साहेब यांच्या हस्ते जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्था यांना अमृतकलश ठेव योजनेची पावती स्थानिक शाखा व्यवस्थापक श्री. गाडगीळ यांना प्रदान केली. त्यानंतर मा. खळदकर साहेब व श्री. लोहिया यांनी मनोगत व्यक्त केले. सहाय्यक शाखा व्यवस्थापक श्री. उदय कुलकर्णी यांनी आभार मानले. सूत्रसंचालन श्री. चंद्रकांत माने यांनी केले.

# टिळक रोड शाखेमध्ये जागतिक महिला दिन साजरा





८ मार्च हा दिवस ‘जागतिक महिला दिवस!’ शाखेतील महिला खातेदार, हितचिंतक परिसरातील महिला पोलीस अधिकारी यांचा सन्मान करण्यात आला.

बँकेच्या मा. संचालिका सौ. कसबेकर व शाखेतील महिला उद्योजक, बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षक सौ. ऋता चितळे यांचा सन्मान करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. एकूण १५ महिला उपस्थित होत्या. त्यांना बँकेच्या वतीने महिला दिनाचा सन्मान म्हणून गुलाबपुष्प, शुभेच्छापत्र व भेटवस्तू दिली. मा. सौ. कसबेकर यांचेशी उपस्थित महिलांनी चर्चा केली. महिला दिन साजरा करून शाखेने मोठा सन्मान केला त्याबद्दल आभार मानण्यात आले. या बैठकीस महिला उद्योजकामध्ये हॉटेल, बांधकाम व्यावसायिक, जिजामाता महिला सहकारी बँक कर्मचारी, उद्यम सहकारी बँक कर्मचारी यांचा समावेश होता. उपस्थित महिला खातेदारांनी या कार्यक्रमाचे निमित्ताने लेखी अभिप्राय देऊन आपल्या भावना व्यक्त केल्या व बँकेच्या एकूणच प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

याशिवाय शाखेच्या वतीने सकाळी शाखा व्यवस्थापकांनी स्वतः ग्राहक पेठ येथील सुमारे ६० महिला व त्यांच्या १ महिला संचालक यांचा गुलाबपुष्प देऊन व शाखा परिसरातील खडक पोलीस स्टेशन येथील महिला अधिकाऱ्यांना भेटून बँकेच्या वतीने सन्मान केला. सन्मानार्थिंनी बँकेच्या या चांगल्या उपक्रमाचे कौतुक केले. शाखेतील महिला सेवकांना सर्व सेवकांचे वतीने गुलाबपुष्प देऊन सन्मान केला. या दिनाचे औचित्य साधून बँकेने आदर व्यक्त केला.

➤ पान क्र. ६ वरून ...

## ताणतणावांवर पुष्पौषधे

चेरीप्लम हे पुष्पौषध असह्य यातना, मनावरचा ताबा सुटल्याने ढसाढसा रडणे, मारायला उठणे, इतरांना किंवा स्वतःला इजा करणे, किंचाळणे या लक्षणांवर नियंत्रण आणते. अतितीव्र भीतीचा रॉकरोझमुळे निःपात होतो, दहशतीचा पगडा नाहीसा होतो. त्रास सहन न होऊन चक्कर येणे, सभोवताली काय चाललेय ते न समजणे, भान हरपणे या लक्षणांवर क्लिमॅटिस काम करते. दुर्घटनेचा ताण असह्य होऊन सटपटलेला मनुष्य रेस्क्यूमुळे सावरतो.

पुष्पौषधांमुळे मनाची सजावट केली जाते. आयुष्य सुंदर, सुसंवादी, सुसंगत बनते. क्षमताविकास व्यक्तिमत्त्व विकास होऊन आयुष्याची वाटचाल योग्य दिशेने होते. जागेअभावी या लेखमालेत आपल्याला फक्त दहा पुष्पौषधांची माहिती घेता आली. पुष्पौषधांचा सांगोपांग अभ्यास करणे फायद्याचे ठरते. शिकायला, वापरायला ही चिकित्सापद्धत सोपी आहे.

**– सौ. सरोज शरद भडभडे,** पुणे
मो. ९८५०९७७८७५

## माहे मार्च व एप्रिल२०१६ मध्ये सेवा निवृत्त झालेले सेवक

| | | |
|---|---|---|
| श्री. जितेंद्र मुळशंकर मेहता | वरिष्ठ अधिकारी | ऑडिट इन्स्पेक्शन विभाग |
| श्री. अनंत हरी मेहंदळे | कनिष्ठ अधिकारी | फर्ग्युसन कॉलेज रोड |
| श्री. धनंजय रामदास आडेप | कनिष्ठ अधिकारी | भवानी पेठ |
| श्री. श्रीकांत वसंत देशपांडे | कनिष्ठ अधिकारी | विलेपार्ले |
| श्री. सतीश हरी चांदोरकर | कनिष्ठ अधिकारी | ऑडिट इन्स्पेक्शन |
| श्री. मुकुंद दत्तात्रय भालेराव | कनिष्ठ अधिकारी | सीआयसीडी |
| श्री. योगेश विनायक गोळे | लेखनिक | फर्ग्युसन कॉलेज रोड |
| श्री. संतोष केशव वैद्य | लेखनिक | रत्नागिरी |
| श्री. कमलाकर विश्वनाथ साने | लेखनिक | सेवा विभाग |
| श्री. विनोद राजाराम येनगंदूल | शिपाई | भवानी पेठ |
| श्री. राजेंद्र गणपत जानवे | शिपाई | बोरिवली शाखा. |

## प्रसिद्ध चित्रकार बहुळकर यांच्या पुस्तकाला कोठावळे पारितोषिक



प्रसिद्ध अभिनेते अमोल पालेकर यांच्याहस्ते पुरस्कार स्वीकारताना श्री. बहुळकर

मॅजेस्टिक प्रकाशनातर्फे देण्यात येणाऱ्या 'केशवराव कोठावळे' पारितोषिकासाठी यंदा ज्येष्ठ चित्रकार सुहास बहुळकर यांच्या 'बॉम्बे स्कूल- आठवणीतले, अनुभवलेले' या पुस्तकाची निवड करण्यात आली आहे. १५,१५१ रुपये आणि मानचिन्ह असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून बहुळकर यांनी एका कलासंस्थेचा इतिहास प्रथमच वाचकांसमोर आणला आहे. व्यक्तिचित्रांच्या अंगाने लिहिलेला हा आत्मनिष्ठ इतिहास दर्जेदार ललित लेखन वाचल्याचा अनुभव देतो, अशा शब्दांत निवड समितीने या पुस्तकाचा गौरव केला आहे.

श्री. सुहास बहुळकर विलेपार्ले शाखेचे मान्यवर खातेदार आहेत. गरुडझेप परिवारातर्फे श्री. बहुळकर यांचे हार्दिक अभिनंदन!




## दीप्ती शिदोरेचा बुद्धीबळ आंतरराष्ट्रीय पंच परीक्षेत अव्वल क्रमांक

बुद्धीबळ स्पर्धांकरिता आंतरराष्ट्रीय पंच या पदासाठी दिल्लीमध्ये नुकत्याच ८ मे रोजी झालेल्या परीक्षेत आपल्या मार्केटयार्ड शाखेचे सेवक श्री. राजेंद्र शिदोरे यांची कन्या दीप्ती हिने अव्वल क्रमांक मिळवीला. ही परीक्षा ऑल इंडिया चेस फेडरेशनने आयोजित केली होती या परीक्षेसाठी भारतीय उमेदवारांसह परदेशी उमेदवारही उपस्थित होते. एकुण ५१ उमेदवारांपैकी ३५ जण पास झाले. त्यापैकी दीप्ती ही सर्वांत वयाने लहान आहे.



जागतिक विश्वविजेते बुद्धीबळ पटू विश्वनाथन आनंद यांच्या सोबत दीप्ती शिदोरे

## Knowledge Page

काही लोकांना एकाच वेळी अनेक कामात हात घालायची खोड असते. कुठलेच काम पूर्ण होत नाही. अशा लोकांना सल्ला देताना एका गोष्टीत Robin cook या लेखकाने छान वाक्य वापरले आहे. Don't put too many carts in front of a horse एकाच वेळी घोड्या समोर अनेक खटारे ठेवू नकोस असा शब्दश: अर्थ.



संग्राहक : अभय बापट

## शाखा वर्धापनदिनाच्या शुभेच्छा!

### शाखा वर्धापनदिनाच्या शुभेच्छा! (माहे एप्रिल ते जुलै)

| | | | |
|---|---|---|---|
| अंबाजोगाई | १ मे | भोर | ६ मे |
| भवानी पेठ | ९ मे | घोडनदी | १३ मे |
| विलेपार्ले | १४ मे | गिरगाव | १४ मे |
| मार्केटयार्ड | २१ मे | रत्नागिरी | २३ मे |
| शि. नगर रत्ना. | २३ मे | साखरपा | २३ मे |
| देवरुख | २३ मे | माखजन | २३ मे |
| संगमेश्वर | २३ मे | छावस | २३ मे |
| फर्ग्युसन रोड | ३ जून | चिंचवड गाव | १० जून |
| पिंपरी | १४ जून | फोर्ट, मुंबई | २८ जून |
| चिपळूण | ४ जुलै | धनकवडी | २९ जुलै |

# कात्राबाई पास – सह्याद्री ट्रेक



मी फेब्रुवारी २०१६ मध्ये पुण्यातील माझ्या तीन डॉक्टर मित्रांसह सह्याद्रीमध्ये अतिशय दुर्गम असा अकोले तालुका, नगर जिल्हा भागातील कात्राबाईचा ट्रेक पूर्ण केला. कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यामध्ये हा ट्रेक होता.

आम्ही शनिवारी संध्याकाळी कुमशेत या गावाला जाण्यासाठी पुण्याहून निघालो. रात्री साडेनऊ वाजता या गावात पोहोचलो. रात्री मुक्काम केला. सकाळी सात वाजता तयार होऊन साडेसात वाजता प्रत्यक्ष ट्रेकला सुरुवात केली. गावातील सखाराम हा वाटाड्या बरोबर होता.

सुरुवातीला सुमारे दोन तास अतिशय दाट जंगलातून चाललो. मग पुढील दोन तास प्रत्यक्ष कात्राबाईचा पास ही चढाई केली. सुमारे अकरा वाजता कात्राबाईचा पास येथे पोहोचलो. ही चढाई अतिशय थकवणारी होती. कारण सुमारे ४६०० फुटांवर आम्ही पोहोचलो होतो. कात्राबाईचा पास हा रतनगड ते हरिश्चंद्रगड असा खडतर ट्रेक आहे. ट्रेकर्स रतनवाडी येथून रतनगड किल्ला करून कात्राबाई पास मार्गे हरिश्चंद्रगड या किल्ल्यावर जातात. अतिशय दुर्गम जंगलातून हा ट्रेक जातो. कात्राबाई पास हा ट्रेकमधील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

आम्ही कात्राबाई देवीचे दर्शन घेऊन पुन्हा थोडी चढाई करून कात्राबाई डोंगरावर पोहोचलो. आम्ही ४७५० फुटांवर होतो. तेथून सभोवतालचा परिसर फारच नयनमनोहर दिसत होता. समोर रतनगड व त्यामागे अलंग मलंग कुलंग व कळसूबाई एक व दोन ही शिखरे दूरवर दिसत होती. उजव्या बाजूला भंडारदरा हे धरण व त्याचा निळसर जलाशय संपूर्ण लक्ष वेधून घेत होता. याचे बाजूला मुडा व घनचक्कर हे डोंगर आहेत. मागील बाजूस हरिश्चंद्रगड, नाप्था माळशेजचे डोंगर दिसत होते. सुमारे एक तास या ठिकाणी थांबून अल्पोपाहार घेऊन उतरायला सुरुवात केली. येताना दुसऱ्या वाटेने उतरलो. उतरतानासुद्धा फारच काळजीपूर्वक उतरावे लागले. बहुतांशी वाट जंगलातून जात होती. शेवटच्या टप्प्यात अतिशय बिकट अशा डोंगराला लागून वाटेवरून रस्ता पार केला. व अतिशय तीव्र उतार उतरून दुपारी सुमारे चार वाजता पुन्हा कुमशेत येथे पोहोचलो. गावात पोहोचता पोहोचता फारच दमछाक झाली होती. साडेचार वाजता वाटाड्या श्री. सखाराम यांचेकडे भोजन करून साडेपाच वाजता पुणे येथे परत येण्यास निघालो. रात्री दहा वाजता पुण्यात पोहोचलो.

सह्याद्री पर्वतरांगांमधील एका अतिशय दुर्गम भागातील ट्रेक पूर्ण केला. सुमारे अठरा ते वीस कि.मी. अंतर चाललो. एक वेगळाच अनुभव व सह्याद्रीचे रौद्ररूप या ट्रेकमध्ये अनुभवायला मिळाले.

**– श्री. राजेंद्र वर्तक**

# पंतप्रधान विमा योजनेंतर्गत बँकेच्या तत्परतेमुळे नागरिकांना दिलासा

## ओतूर येथील लाभधारक : पतीच्या निधनानंतर प्रधानमंत्री विमा योजनेचा लाभ




**ओतूर** : आजपर्यंत कोणत्याही सरकारी योजनेचा लाभ मिळाला नाही त्यामुळे पंतप्रधान जीवन विमा योजनेचा लाभ मिळेल असे वाटले नव्हते, परंतु पंतप्रधान विमा योजनेची पॉलिसी काढली होती. पतीच्या निधनानंतर या महिलेने काही कागदपत्रे बँकेत जमा केली आणि कोणत्याही एजंटशिवाय थेट खात्यात दोन लाख रुपये जमा झाल्याचा अनपेक्षित लाभ मिळाला, असे मत नागरिकांनी व्यक्त केले.

प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेंतर्गत ओतूर (ता. जुन्नर) येथील आपल्या बँकेच्या शाखेत उतरलेल्या विमाधारकाच्या वारसास दोन लाखांचा धनादेश प्रदान करण्यात आला.

या शाखेत प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेंतर्गत ओतूर ढमालेमळा येथील शेतकरी जयदिप राम रावत यांनी विमा उतरविला होता. परंतु, त्यांचे आकस्मिक निधन झाल्याने या योजनेंतर्गत मिळणाऱ्या विम्याची रक्कम कै. जयदिप रावत यांच्या पत्नी विशाखा जयदिप रावत यांना ओतूरचे सरपंच धनंजय डुंबरे, उद्योजक चंद्रकांत डुंबरे, डॉ. भरत घोलप, डॉ. रश्मी घोलप, हडपसर शाखेचे शाखा व्यवस्थापक सुरेश पराड, ओतूर शाखेचे शाखाधिकारी बाबासाहेब जाधव, संभाजी तांबे यांच्या हस्ते हा धनादेश प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रम प्रसंगी ओतूर शाखेचे शाखाधिकारी बाबासाहेब जाधव, उपशाखाधिकारी मारुती नवले, अनिल कुसुरकर, बबन भोर, मंदार भिडे, बबन गुंजाळ, सचिन पिंगट, पराग सबनीस, बाळासाहेब डुंबरे, माणिक वाळेकर, अजित करडिले, संतोष तांबे, जालिंदर उकिर्डे, राजेंद्र क्षीरसागर आदी बँकेचे कर्मचारी व सभासद उपस्थित होते. या वेळी बँकेचे शाखाधिकारी बाबासाहेब जाधव म्हणाले, जनता सहकारी बँकेच्या ५६ शाखा असून या सर्व शाखांमधून जुन्नर तालुक्यात विशाखा रावत 'प्रधानमंत्री' जीवन ज्योती विमा योजनेच्या पहिल्या लाभार्थी रावत असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

सूत्रसंचालन भाऊसाहेब खाडे यांनी केले, तर आभार बाबासाहेब जाधव यांनी मानले.

# Inter Personal Communication and Customer Service

Our Country has opted to Free Market Economy two decades ago. Reserve Bank the supervisory head of the banks in India is gradually withdrawing restrictions on banks to make them autonomous. The liberalized bank and branch licensing has triggered severe competition in banks. The new players with their innovative products and aggressive marketing strategies are making business development in banks increasingly difficult. Quality customer service is vital ingredient of business growth today and complimentary communication is the life line of customer service. It is therefore very essential for the banks to improve interpersonal communications skills of their staff to better their customer service.

More than 95% of the cases of dispute, misunderstanding or quarrel with the customer are due to bad communication or crossed communication. Communication cannot be avoided. Instead we need to learn the techniques of complimentary communication. The word communication is derived from the Latin word commune meaning common. The two individuals participating in interpersonal communication should strongly feel that they are common - at par with each other. There are two parties (sender and the receiver) and six steps in the process of interpersonal communication.

| Sender | | | Receiver |
|---|---|---|---|
| Ideation | देणे | घेणे | Receipt |
| Encoding | सांकेतिकता | विश्लेषण | Decoding |
| Transmission | वहन | अधिग्रहण | Action |

It is the responsibility of the two individuals to ensure that the flow of communication from ideation to Action is smooth and without any obstacle.

Process of communication in sender's Zone.

Sender is the originator of the communication. Origin of an idea in the senders mind is ideation. Mature, divine, honest, true, thought should come in the originator's mind. The desire to make fun or criticize others will result in cross communication. Correct perception of ones job, sense of responsibility, open mind, right mind set, clear thoughts, mature thinking, interest in the event, interest in the individual participating in communication, desire and capacity to solve problems will generate good thought. Correct ideation depends on the following-

a) Perception b) Self Images c) Interpersonal options

The thought generated should be wrapped/packed in a device and then transported to receiver. The packing of thought is encoding. The device used in encoding can be both verbal and non verbal.

Verbal - Language, Non verbal - Body language, Actions, Gestures.

Language used in communication should be sweet, understandable, easy. The gaze pitch, range of the language will also distort the message. For effective communication the body language of the communicator should be complimentary, action should be mannerly and gestures supportive. Transmission is transporting of idea/thought to receiver. The media used in transmission should be honest, dependable, trustworthy and reliable to ensure full proof, smooth communication.

Process of Communication in Receiver's Zone

The receiver should receive/hear the correct and intact message without any manipulation. The message received should be correctly decoded and rightly interpreted to avoid unanticipated action.

Receiver - In banking organization, our role is mostly of a receiver. We listen to our superiors, our coworkers and also to our customers. Complementary inter personal communication with our customer is our top priority. Be a good receiver. The receiver should be informal, patient. He should put the speaker at ease. His body language should display that he is anxious to listen.

He should receive the customer with smile, salute him with respect and create the climate for an informal complimentary communication. Practice emotional intelligence, hold your temper, remove distractions-voice pollutants if any for a comfortable dialog. Hearing impairment, casual attitude, poor listening habits need a correction. Make eye contact, shake hands, bodily exhibitions to make the sender comfortable. Indicate acceptances, exhibit affirmatives, ask questions, paraphrasing to make the customer delighted. The receiver should avoid arguments, criticism, interaction which will disturb the customer.

Attributes of a good communicator are as under :

a) Sense of Equality, b) Positiveness, c) Supportiveness, d) Openness, e) Sense of Empathy

Communication and customer service - go hand in hand. For best customer service please ensure following points.

a) Receive customer with smile.
b) Honor - Respect him
c) appreciate, praise him
d) Call him by name
e) Make some informal talk and greet him
f) Never criticize, Never argue
g) Attend to him on priority
h) Get his work done fast
i) Be cordial, generous, considerate, alert
j) Be friendly, genuinely interested in him
k) Display commitment, involvement and love for your Organization.

***

# आनंदाची पाठशाळा : 'ओळखा स्वत:ला घडवा स्वत:ला'



आणखी काही उदाहरणे. माझ्या माहितीतल्या एका महिलेने एस.एस. सी.नंतर बालवाडीचा कोर्स केला. पुढे लग्न झाले, पतिराज वायुदलात असल्याने अनेक ठिकाणी बदल्या झाल्या. ही महिला गृहिणी होती. पुढे पती निवृत्त झाल्यावर एका औद्योगिक शहरात स्थायिक झाले. त्या गृहिणीला थोडी उसंत मिळाली त्यामुळे तिने एक छोटीशी जागा घेऊन प्रथम पाळणाघर सुरू केले. शहर वाढत होते म्हणून व्यवसाय वाढत होता. पालकांची गरज ओळखून तिने नर्सरी शाळा सुरू केली. तिच्या लक्षात एक संधी आली, अनेक शाळात विशेषत: बालवाडीत प्रत्येक विशेष दिवसाला म्हणजे सणांचे दिवस, संमेलने, गोकुळाष्टमी, शिवरात्र, शिवजयंती, अशा दिवसांना मुलांना त्या त्या दिवसाप्रमाणे वेश घालून यायला सांगितले जाते. या महिलेला शिवणकाम येत होते. तिने अचूक संधी हेरली, शहरातील अनेक टेलरिंग दुकानात जाऊन कापडाचे उरलेले तुकडे रद्दीच्या भावात विकत घेणे सुरू केले, कल्पकतेने त्या तुकड्यातून लहान मुलांचे फॅन्सी ड्रेस ढिगांनी तयार केले आणि ते भाडेतत्त्वावर द्यायला सुरुवात केली. व्यवसाय वाढतच गेला. पुढे आणखी एक कल्पना तिने आचरणात आणली, कापडाच्या कटपिसमधून दुपटी आणि तान्ह्या मुलांचे कपडे शिवणे हा नवीन व्यवसाय सुरू केला. तो व्यवसायही उत्तम बहरला, यशस्वी महिला उद्योजक म्हणून महापालिकेकडून प्रशस्तिपत्रक मिळाले. स्वत: फॅन्सी ड्रेसच्या स्पर्धेत भाग घेतला आणि अनेक ठिकाणी पारितोषिके मिळवली. अशाच स्पर्धांमधून सिंगापूर येथे झालेल्या स्पर्धेत भाग घेण्याचे तिला निमंत्रण आले. या ट्रिपचा सर्व खर्च आयोजकांचा होता. तेथेही बक्षीस मिळाले आणि हे सर्व वयाच्या पस्तिशी-चाळिशीनंतर. दुर्दम्य आत्मविश्वास आणि अविरत प्रयत्नाने त्या महिलेने हे यश प्राप्त केले.

माझी एक विद्यार्थिनी अजूनही कधी कधी भेटते. तिच्या घरची आर्थिक स्थिती नाजूक होती म्हणून मेडिकलला प्रवेश मिळूनही तिने तो नाकारला. आणि केमिस्ट्री विषय घेऊन ती बी.एस्सी. झाली. लहान भावंडे शिकत होती म्हणून बँकेत नोकरीला लागली. आज या गोष्टीला किमान २५ वर्षे तरी झाली असतील. काही वर्षांपूर्वी भेटली तेव्हाच ती असिस्टंट जनरल मॅनेजर म्हणून कार्यरत होती. नंतर मला कळले की तिच्या बँकेने पुण्यात उघडलेल्या पहिल्या महिला शाखेची ती प्रमुख होती. अनेक वर्षांत तिची भेट नाही, पण मला खात्री आहे की एका दिवस ती तिच्या बँकेत सर्वोच्च स्थानी असेल.

एम.बी.ए.च्या प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती विद्यापीठात घेत असता सातारची एक विद्यार्थिनी "सर आत येऊ का?" असे विचारून मुलाखतीला आली. साधा वेष होता. आल्या आल्या म्हणाली, "सर एक विनंती आहे, कृपया मला मराठीतून प्रश्न विचाराल का?" मी आणि माझे मुलाखत घेणारे सहकारी दोघांनीही काही हरकत नाही असे सांगून तिला आश्वस्त केले. त्या मुलीने वनस्पतिशास्त्र विषय घेऊन बी.एस्सी. केले होते. साहजिकच माझ्या सहकाऱ्यांनी प्रश्न विचारला, "एम.बी.ए. करण्याचा निर्णय कोणत्या कारणाने तुम्ही घेतलात? तुमचा विषय वनस्पतिशास्त्र आहे म्हणून मी विचारतो आहे."

"सर मी एक उद्योजक आहे. कॉलेजात असल्यापासून मी आयुर्वेदिक उत्पादने घरी तयार करायला सुरुवात केली. सध्या हा उद्योग माझ्या घरातच आहे, पण लवकरच मी एम.आय.डी.सी.मध्ये एक शेड भाड्याने घेऊन तिथे हा उद्योग करणार आहे." तिने सांगितले.

"कोणती औषधे तुम्ही तयार करता?" मी विचारले.

"सर औषधे सध्यातरी कोणतीच नाहीत. मी हर्बल चहा तयार केला आहे तसेच हर्बल फेसपॅक तयार केला आहे, त्याशिवाय काही औषधी तेले आणि उटणी करण्याचा प्रयत्न आहे. मी तयार केलेल्या काही उत्पादनांना सरकारचे प्रशस्तिपत्रकही मिळाले आहे." असे म्हणत तिने तिची फाइल आम्हाला बघायला दिली. तिची फाइल आम्ही सुमारे १०-१२ मिनिटे मग्न होऊन पाहत होतो. छोट्या शहरातून आलेली एक साधी मुलगी इतकी प्रगती करते हे पाहून आम्हा परीक्षकांना आनंद झाला.

"मग एम.बी.ए. का करणार आहात?" माझ्या सहकाऱ्याचा प्रश्न आला. "सर मला व्यवसाय करायचा आहे. मी वनस्पतिशास्त्र शिकले आहे. रसशाळेचा कोर्स केला आहे. माझा व्यवसाय भविष्यात वाढणार आहे याची मला खात्री आहे. माझे इंग्लिश तितकेसे चांगले नाही, तसेच कॉमर्स आणि अकौंटन्सी याचीही मला माहिती नाही, कारण हा सर्वच प्रांत माझ्या शिक्षणापेक्षा वेगळा आहे. मी एम.बी.ए. करायचा निर्णय घेतला, कारण मला माझ्या व्यवसायासाठी त्याचा नक्कीच फायदा होईल."

आम्हा परीक्षकांच्या मनात एकच विचार आला, "तथास्तु!"

मित्रांनो जिद्द, धारिष्ट, महत्त्वाकांक्षा, आत्मविश्वास, प्रयत्नवादी असणे आणि वेगळा विचार करणे हे सर्व गुण त्या विद्यार्थिनीला प्राप्त आहेत, याची आम्हा परीक्षकांना खात्री पटली.

ईशान्य भारतातून- मणिपूरमधून आलेल्या एका प्रयत्नवादी तरुणाचे आणखी एक उदाहरण.

**प्रा. डॉ. श्रीधर चितळे व प्रा. डॉ. चंद्रशेखर चितळे लिखित 'ओळखा स्वत:ला घडवा स्वत: ला' या पुस्तकातील वेचक, वेधक व रोचक भाग क्रमश: प्रसिद्ध करीत आहोत.**

हा विद्यार्थी १९८३-८४ मध्ये बी.एस्सी. करण्यासाठी पुण्यात आला. थोडा धास्तावलेला, बुजलेला आणि हिंदी आणि मराठी दोन्ही भाषा येत नसल्याने फारसा कोणात न मिसळणारा हा तरुण प्रयोगशाळेत माझ्या संपर्कात आला. त्या क्षणापासून आजतागायत त्याने जी प्रगती केली ती थोडक्यात सांगतो. कॉलेजमध्ये असताना वर्गात नेहमी हजर असणारा म्हणून त्याची ओळख शिक्षकांना होती. रसायनशास्त्र विषयात बी. एस्सी. आणि एम.एस्सी. या दोन्ही पदवी परीक्षांत त्याने उत्तम गुण मिळवले. काही काळ त्याला माझ्याच कॉलेजमध्ये अर्धवेळ प्रयोगशिक्षक म्हणून नोकरी मिळाली. आमचा संपर्क सतत होता. कोणतीही अडचण आली की माझ्याशी तो मोकळेपणाने बोलायचा. पुढे काहीतरी अजून शिकावे असे त्याला वाटत असे. शिक्षकाची नोकरी मिळत नाही, तर रसायनांच्या कारखान्यात काम शोध असे मी त्याला सुचवले. तसे कामही त्याला मिळू शकले नाही. तो थोडा नाराज झाला, पण त्याची जिद्द ठाम होती. दरम्यानच्या काळात त्याला एखादा पर्यावरणशास्त्राचा कोर्स कर किंवा औद्योगिक सुरक्षाप्रणालीचा कोर्स कर असे सांगितले. त्याने राष्ट्रीय पर्यावरण संस्थेमधून दूरशिक्षणाद्वारे (डिस्टन्स लर्निंग) पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन पदविका प्राप्त केली. तसेच 'इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स'मधून 'डिप्लोमा इन इंडस्ट्रिअल सेफ्टी' हा अभ्यासक्रम उत्तम गुण मिळवून पूर्ण केला. अजूनही त्याच्या नोकरीच्या प्रयत्नांना यश येत नव्हते. मधल्या काळात त्याचे शिकवण्या घेणे, मिळेल ती किरकोळ नोकरी करणे सुरू होते. आता तसे त्याचे शिक्षण पूर्ण होऊन ७-८ वर्षे झाली होती, पण तरीही आयुष्याला स्थिरता आलेली नव्हती. आणि एके दिवशी त्याच्या आयुष्यातली पहिली उत्तम संधी अचानक त्याच्या समोर आली. त्याने पूर्ण केलेल्या 'इंडस्ट्रिअल सेफ्टी'च्या कोर्समुळे त्याला बांधकाम क्षेत्रातील एका मोठ्या कंपनीने त्याला दुबईला

➤ पान क्र. १२ वर ...

# टिळक रोड शाखेचे दोन अभिनव उपक्रम

## 'इच्छापत्र' विषयावर व्याख्यान




नुकतेच शाखेमार्फत 'इच्छापत्र' या विषयावर पुण्यातील विख्यात वकील मा. दादासाहेब बेंद्रे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. मा. संचालक श्री. सुधीर पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाल्यानंतर शाखा व्यवस्थापक श्री. राजीव बर्वे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची आवश्यकता व बँकेची माहिती सांगितली. त्यानंतर एक्झिक्युटर ट्रस्टी विभागातील अधिकारी श्री. वडतिले यांनी ट्रस्टी विभागासंबंधी माहिती सांगितली. शाखेतील कनिष्ठ अधिकारी श्री. विजय पुजारी यांनी मा. श्री. दादासाहेब बेंद्रे यांचा परिचय करून दिला. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात मा. बेंद्रे यांनी 'इच्छापत्राचे महत्त्व' व कायदेशीर बाबींची माहिती सांगितली. व उपस्थितांचे शंकासमाधान केले. श्री. हेमंत भट यांनी आभार मानले.

या अभिनव उपक्रमांची खातेदारांनी खूप प्रशंसा केली.

➤ पान क्र. ११ वरून ...

### आनंदाची पाठशाळा : 'ओळखा स्वत:ला घडवा स्वत:ला'

नोकरी देऊ केली. एका मोठ्या बांधकाम प्रकल्पावर त्याची सेफ्टी ऑफिसर म्हणून नेमणूक झाली. आज तो एका बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये 'जनरल मॅनेजर, सेफ्टी' म्हणून काम करतो. त्याच्या क्षेत्रातील सर्वोच्च परीक्षा त्याने उत्तीर्ण केली आहे. इंग्लंडमधल्या इंडस्ट्रिअल सेफ्टीविषयक राष्ट्रीय संस्थेमधून 'चार्टर्ड सेफ्टी ऑडिटर' म्हणून त्याने सन्मान प्राप्त केला. या सर्व काळात त्याची धडपड आणि जिद्द मला नेहमीच कौतुकास्पद वाटत आली आहे. नोकरीनिमित्त अनेक देशात त्याने अनुभव घेतलेला आहे. आता त्याच्या क्षेत्रामध्ये त्याची ओळख एक तज्ज्ञ म्हणून आहे. त्याने कष्टपूर्वक सतत प्रयत्न करून उत्तम यशस्वी करिअर प्राप्त केले.

हे बोलणे ऐकल्यावर अनिरुद्धने प्रश्न विचारला, ''सर, शिक्षक म्हणून किंवा सरकारी सनदी अधिकारी म्हणून काम करणे ही माझी महत्त्वाकांक्षा आहे. या सेवांमध्येही करिअर करता येते का?''

(क्रमश:)

## रद्दीविक्रीतून दुष्काळग्रस्तांसाठी मदत



सामाजिक कार्यामध्ये आपल्या बँकेचा सहभाग नेहमीच मोठ्या प्रमाणात असतो. राज्यावर कोणतेही संकट आले की आपल्या बँकेचा मदतीचा हात तत्परतेने पुढे होत असतो. या वर्षी संपूर्ण महाराष्ट्राला दुष्काळाच्या संकटाने ग्रासले आहे. दुष्काळग्रस्तांसाठी मदत म्हणून आपल्या बँकेने रा. स्व. संघ जनकल्याण समितीच्या मदतीने निधी संकलनाचे अभियान आपल्या टिळक रोड शाखेमार्फत राबवून; खातेदारांशी संपर्क साधून मोठ्या प्रमाणात निधी संकलन केले आहे.

त्याचबरोबर अभिमानाने नमूद करावे असे एक वेगळे अभियान, निधी संकलनासाठी राबवले गेले. 'रद्दीविक्रीतून दुष्काळग्रस्तांसाठी मदत'

शाखापरिसरातील सर्व चौकांमध्ये, मंदिरस्थानी, रस्त्यावर सगळीकडे नागरिकांना घरातील रद्दी टिळक रोड शाखेमध्ये आणून देणेसंबंधी आवाहन करणारे फलक लावले होते. या आवाहनास नागरिकांनी, खातेदारांनी मोठा प्रतिसाद दिला. दि. २९ एप्रिल २०१६ रोजी जनकल्याण समितीचे महाराष्ट्र प्रांत कार्यवाह मा. श्री. विनायकराव डंबीर यांचे हस्ते या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन झाले. दोन दिवस २९ आणि ३० एप्रिल २०१६ रोजी टिळक रोड शाखा परिसरातील खातेदारांनी आपल्या घरातील रद्दी बँकेत आणून दिली व या सामाजिक कार्यास हातभार लावला.

### वाचकांना नम्र आवाहन

गरुड झेप मध्ये प्रकाशित करण्यासाठी शाखा, कर्मचारी, ग्राहक, बँक, बँकिंग यांचे विषयी उपयुक्त तसेच महत्त्वाची बातमी, माहिती, विशेष उपलब्धी, गौरव पुरस्कार छायाचित्रांसह ए फोर साईजच्या पांढऱ्या कागदावर सुवाच्य अक्षरात लिहून बंद पाकिटात खालील पत्त्यावर पाठवावा. **पत्ता : श्री. जयंत लोकरे, मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कार्यालय, पुणे., मो. क्र. : ९९७०८००३४८ गरुड झेपसाठीची माहिती, लेख, फोटो इ. ईमेलद्वाराही पाठविता येईल.**

**❊ ईमेल आयडी : hrd@janatabankpune.com**

गरुड झेप

गरुड झेप ही गृहपत्रिका केवळ खासगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही.
गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.
दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मोबा. : ९८२२८८२५०९)

१०/०६/२०१६